गणपती बाप्पा मोरया
| वर्ष - 8 | अंक - 64 | UDYAM-MH-26-0158827 |
# महाईन्यूज ™
लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!
www.mahaenews.com | मंगळवार, दिनांक 10 सप्टेंबर 2024 | पुणे आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## आजपासून कुटुंब भेट मोहीम; दहा योजनांचा घरोघरी प्रचार

# मुख्यमंत्री ‘लाडक्या बहिणीं’च्या दारी!

### शिवसैनिक दररोज लाभार्थी कुटुंब, लाभ न मिळालेल्या 15 कुटुंबांची भेट घेतील

। मुंबई । महाईन्यूज

**‘लाडकी बहीण योजने’सह राज्य सरकारच्या दहा महत्त्वपूर्ण योजनांची माहिती घरोघरी पोहोचवण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ‘मुख्यमंत्री लाडकी बहीण कुटुंब भेट’ मोहिमेची घोषणा सोमवारी केली. मुख्यमंत्री शिंदे हे आज, मंगळवारी १५ कुटुंबांची भेट घेऊन या मोहिमेची सुरुवात करणार आहेत.**



मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ‘वर्षा’ या शासकीय निवासस्थानी सोमवारी पत्रकार परिषद घेऊन नव्या मोहिमेची माहिती दिली. ‘या मोहिमेत शिवसैनिक दररोज १५ कुटुंबांची भेट घेतील. ‘मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचे लाभार्थी कुटुंब आणि लाभ न मिळालेल्या कुटुंबांचीही भेट घेतली जाईल. त्यांना योजनेत सामावून घेण्याचे प्रयत्न केले जातील,’ असे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले. या मोहिमेंतर्गत विशेष ॲपही सुरू करण्यात येणार आहे. सर्व कार्यकर्त्यांच्या मोबाइलमध्ये या ॲपचा समावेश असेल, असे मुख्यमंत्री म्हणाले. तत्पूर्वी, शिंदे यांनी राज्यभरातील शिवसेना मंत्री, खासदार, आमदार आणि कार्यकर्ते यांच्याशी व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे संवाद साधला.

‘अर्थव्यवस्थेला चालना देणारी सर्वांत मोठी शक्ती महिला आहे. तिच्या हाती येणारे पैसे पुन्हा अर्थव्यवस्थेत फिरणार आहेत. महाराष्ट्राची अर्थव्यवस्था मजबूत झाली तर त्याचा देशाला फायदा होईल,’ असे मुख्यमंत्री म्हणाले. यापूर्वी ‘शासन आपल्या दारी’ या योजनेत राज्यातील पाच कोटींहून अधिक नागरिकांना लाभ मिळाला. सरकारने महात्मा ज्योतिबा फुले जनआरोग्य योजनेची मर्यादा दीड लाखांवरून पाच लाख रुपये केली. हे सरकार शेतकरी, कष्टकरी, महिला, युवक, वारकरी, ज्येष्ठ नागरिक अशा सर्वच घटकांच्या कल्याणासाठी कटिबद्ध असल्याचा पुनरुच्चार मुख्यमंत्र्यांनी केला.

### दीड कोटी महिलांच्या खात्यांत पैसे

‘मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजने’च्या नोंदणीला ३० सप्टेंबर २०२४ पर्यंत मुदवाढ देण्यात आली आहे. आत्तापर्यंत सुमारे दोन कोटी महिलांनी या योजनेत अर्ज केले आहेत. त्यापैकी १ कोटी ६९ लाख महिलांच्या खात्यात पैसे जमा झाले आहेत,’ असे मुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले.

## १० लाख मुंबईकर कोकणात, तब्बल ३४२ विशेष रेल्वे

### पाच हजार जादा ST बस; गुरुवारपासून कोकणकरांचा परतीचा प्रवास

। मुंबई ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

कोकणवासींच्या जिव्हाळ्याचा सण असलेल्या गणेशोत्सवासाठी महामुंबईतील तब्बल १० लाख प्रवासी कोकणात दाखल झाले आहे. विशेष रेल्वे, जादा एसटी, खासगी बस आणि चारचाकी वाहनांतून त्यांनी कोकणातील मूळ गाव गाठले आहे.



यामुळे उत्सवकाळात कोकणातील घरे भरल्याचे सुखद चित्र आहे.

कामानिमित्त मुंबई, उपनगर, ठाणे, वसई, पालघर, कल्याण, बदलापूर येथे स्थायिक झालेल्या मूळच्या कोकणवासींना शिमगा आणि गणेशोत्सवाला गावाची ओढ लागते. यामुळे सणासुदीला कोकणवासींना गावी पोहोचवण्यासाठी केंद्र आणि राज्य सरकारकडून विशेष तयारी करण्यात येते. यंदा गणेशोत्सवात कोकण, मध्य आणि पश्चिम रेल्वेवरून कोकणासाठी ३४२ विशेष रेल्वेगाड्या चालवण्यात येत आहेत.

### संपानंतर एसटीची धाव

**राज्य परिवहन (एसटी) महामंडळाने ३ ते ८ सप्टेंबरदरम्यान गणपती विशेष वाहतूक सुरू केली होती. उत्सवाच्या पाच दिवस आधी झालेल्या दोन दिवसांच्या संपाचा फटका प्रवाशांसह महामंडळालाही बसला. ५ सप्टेंबरपासून पूर्ण क्षमतेने एसटीची वाहतूक सुरू झाली. यंदा पाच हजार गाड्यांमधून अडीच लाखांहून अधिक प्रवाशांनी सुखरूप कोकणातील गाव गाठले. विशेष गाड्यांवर १० हजार चालक-वाहकांना कोकण मार्गावर कर्तव्यावर नियुक्त केले होते.**

# ‘हे खा’, ‘ते खा’ सांगणे म्हणजे धर्म नव्हे!

## सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांनी व्यक्त केले मत

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**धर्म म्हणजे पूजा नाही. सत्य, करुणा, शुचिता आणि तपस्या यातून धर्माची मूल्ये पुढे आली आहेत. त्यामुळे ‘हे खा’, ‘ते खा’ किंवा ‘ते खाऊ नका’, ‘शिवू नका’, हे सांगणे म्हणजे धर्म नाही. हिंदू धर्म हे नाव नाही, तर एका विचाराने जगणारे आणि सर्वांना स्वीकारणारे ते एक उदात्त विशेषण आहे,’ असे मत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांनी येथे सोमवारी व्यक्त केले.**



‘साप्ताहिक विवेक’ आणि श्री शिवाजी रायगड स्मारक मंडळाच्या वतीने डॉ. मिलिंद पराडकर लिखित ‘तंजावरचे मराठे : दक्षिणेच्या इतिहासातील योगदान’ या पुस्तकाचे प्रकाशन सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांच्या हस्ते झाले. त्या वेळी ते बोलत होते. श्रीमंत राजश्री बाबाजी राजेसाहेब भोसले छत्रपती, महाराणी गायत्री राजे भोसले, जावळीचे आमदार शिवेंद्रराजे भोसले, हिंदुस्थान प्रकाश संस्थेचे अध्यक्ष रमेश पतंगे, श्री शिवाजी रायगड स्मारक मंडळाचे कार्यवाह सुधीर थोरात आदी या वेळी उपस्थित होते. हिंदवी राष्ट्रीय प्रेरणा या ग्रंथ प्रकल्पाचे या वेळी उद्घाटन झाले.‘जगण्याच्या सुरक्षिततेसाठी नव्हे, तर ‘वसुधैव कुटुंबकम्’ हा शाश्वत धर्म जगाला देण्यासाठी आपल्या राष्ट्राची निर्मिती झाली आहे. सत्ययुगापासून स्वातंत्र्य लढ्यापर्यंत धर्म हीच आपली शाश्वत प्रेरणा राहिली आहे. यालाच हिंदू प्रेरणा असे म्हटले जाते. हिंदू म्हणजे मुस्लिम विरोध नाही, तर सर्व समाजाचे रूप दर्शविणारे विशेषण आहे. सर्व विविधतांना स्वीकारणारे तो उदात्त भाव आहे,’ असे डॉ. भागवत यांनी सांगितले. ‘तंजावरमधील मराठ्यांचा इतिहास हा एका घराण्याचा इतिहास नाही,’ असे बाबाजीराजे भोसले यांनी सांगितले. ते म्हणाले, ‘तंजावरमध्ये केवळ भोसलेच नाही, तर डोंगरे, केसरकर, कुलकर्णी, महाडिक, गाडे आदी आडनावांची घराणी आहेत, ज्यांचे मूळ महाराष्ट्रात आहे. हा केवळ एका घराण्याचा इतिहास नसून महाराष्ट्राच्या गौरवशाली वारशाचा इतिहास आहे. महाराष्ट्र आणि तंजावरचा संबंध वाढायला हवा.’ ‘भौगोलिक, सांस्कृतिक आणि ऐतिहासिक संदर्भाने तंजावरचा अधिक अभ्यास व्हायला हवा,’ असे मत लेखक डॉ. मिलिंद पराडकर यांनी व्यक्त केले. साप्ताहिक विवेकच्या संपादक अश्विनी मयेकर यांनी प्रास्ताविक केले.‘धर्मप्राय देशाचा धागा एकतेचा आहे. सत्यातून येणारा हिंदू धर्म भारतीय राष्ट्राची प्रेरणा आहे. हिंदू हा गौरव आहे. मात्र, पत्ता लागू न देता, हजारो वाटांनी त्यावर अतिक्रमण होत आहे. हे अतिक्रमण आर्थिक, सामाजिक, राजकीय अशा विविध बाबींचे असून, ते देशासाठी घातक आहे. भारत देश मोठा झाला, तर राजकीय दुकान बंद होईल, ही भीती या अतिक्रमणामागे आहे. अस्तित्व टिकविण्यासाठी राष्ट्र किंवा राज्य निर्माण झालेले नाही. ते चोहोबाजूंनी सुरक्षित असून, समृद्ध आहे. इस्लामी आक्रमणाचे स्वरूप लक्षात न आल्याने अनेक देदिप्यमान संघर्ष विफल झाले. त्यावर छत्रपती शिवाजी महाराजांचा हिंदवी स्वराज्याचा उपाय लागू पडला. त्या वेळी ते बोलत होते. श्रीमंत राजश्री बाबाजी राजेसाहेब भोसले छत्रपती, महाराणी गायत्री राजे भोसले, जावळीचे आमदार शिवेंद्रराजे भोसले, हिंदुस्थान प्रकाश संस्थेचे अध्यक्ष रमेश पतंगे, श्री शिवाजी रायगड स्मारक मंडळाचे कार्यवाह सुधीर थोरात आदी या वेळी उपस्थित होते.

### हिंदू म्हणजे मुस्लिम विरोध नाही

हिंदवी राष्ट्रीय प्रेरणा या ग्रंथ प्रकल्पाचे या वेळी उद्घाटन झाले.‘जगण्याच्या सुरक्षिततेसाठी नव्हे, तर ‘वसुधैव कुटुंबकम्’ हा शाश्वत धर्म जगाला देण्यासाठी आपल्या राष्ट्राची निर्मिती झाली आहे. सत्ययुगापासून स्वातंत्र्य लढ्यापर्यंत धर्म हीच आपली शाश्वत प्रेरणा राहिली आहे. यालाच हिंदू प्रेरणा असे म्हटले जाते. हिंदू म्हणजे मुस्लिम विरोध नाही, तर सर्व समाजाचे रूप दर्शविणारे विशेषण आहे. सर्व विविधतांना स्वीकारणारे तो उदात्त भाव आहे,’ असे डॉ. भागवत यांनी सांगितले.‘तंजावरमधील मराठ्यांचा इतिहास हा एका घराण्याचा इतिहास नाही,’ असे बाबाजीराजे भोसले यांनी सांगितले.

# राज्य परीक्षा परिषदेतर्फे ‘टीईटी’ची घोषणा

## 10 नोव्हेंबर रोजी परीक्षा; 9 ते 30 सप्टेंबर या कालावधीत अर्ज भरता येणार

। पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राज्यातील पहिली ते आठवीच्या वर्गांना शिक्षक होण्यासाठी अनिवार्य असलेली शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) राज्य परीक्षा परिषदेतर्फे १० नोव्हेंबर रोजी घेतली जाणार आहे. त्यासाठी ९ ते ३० सप्टेंबर या कालावधीत अर्ज भरता येणार आहे.**



राज्य परीक्षा परिषदेचे उपायुक्त संजय राठोड यांनी या बाबतची माहिती प्रसिद्धिपत्रकाद्वारे दिली. राज्यातील पहिली ते आठवीच्या सर्व माध्यमाच्या, सर्व व्यवस्थापनांच्या अनुदानित, विनाअनुदानित शाळांमध्ये शिक्षण सेवक, शिक्षक या पदांसाठी उमेदवार टीईटी उत्तीर्ण असणे बंधनकारक आहे. राज्यात पवित्र संकेतस्थळाद्वारे शिक्षक भरती प्रक्रिया राबवण्यात येत आहे. पहिल्या टप्प्याची भरती अंतिम टप्प्यात आहे, तर दुसऱ्या टप्प्यात काही हजार पदे भरली जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे टीईटी कधी होणार याकडे उमेदवारांचे लक्ष लागले होते. परीक्षा परिषदेने जाहीर केलेल्या वेळापत्रकानुसार, १० नोव्हेंबर रोजी टीईटी होणार आहे. २८ ऑक्टोबर ते १० नोव्हेंबर या कालावधीत प्रवेशपत्राची मुद्रित प्रत काढून घेता येणार आहे. १० नोव्हेंबर रोजी परीक्षेतील पेपर १ सकाळी साडेदहा ते एक या वेळेत, तर दुपारी दोन ते साडेचार या वेळेत पेपर २ होणार आहे. परीक्षेचे अर्ज केवळ ऑनलाइन भरणे आवश्यकल आहे. अर्ज भरणे, शुल्क या बाबतची माहिती परीक्षा परिषदेच्या संकेतस्थळावर देण्यात आली.

### खोटी माहिती भरल्यास कारवाई

मूळ प्रमाणपत्रांच्या पडताळणीच्या अधीन राहून उमेदवारांना परीक्षेला तात्पुरता प्रवेश देऊन निकाल घोषित केला जाईल. परीक्षेच्या निकालानंतर शैक्षणिक व व्यावसायिक कागदपत्रांची पडताळणी प्रमाणपत्र वितरणावेळी करण्यात येईल. प्रमाणपत्र पडताळणीच्या वेळी कागदपत्रे अपूर्ण असल्यास किंवा उमेदवार प्रमाणपत्रे सादर करू न शकल्यास परीक्षेची उमेदवारी रद्द करण्यात येईल. ऑनलाइन अर्जातील माहिती आणि मूळ कागदपत्रांत तफावत आढळल्यास उमेदवारी रद्द करण्यात येईल, असे स्पष्ट करण्यात आले आहे.टीईटी २०१८ आणि २०१९मधील गैरप्रकारात समाविष्ट असलेल्या उमेदवारांची यादी परीक्षा परीक्षा परिषदेच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहे.

## ‘पेव्हिंग ब्लॉक’ची निकृष्ट कामे करणारे 11 ठेकेदार एका वर्षासाठी काळ्या यादीत

# पिंपरीतील रस्तेदुरुस्तीची निकृष्ट कामे!

## निकृष्ट कामाचे दुप्पट पैसे ठेकेदारांकडून वसूल केले जाणार

। पिंपरी-चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**महापालिकेच्या स्थापत्य विभागाची कामे घेण्यासाठी ४० टक्के कमी दराने निविदा भरून रस्ते दुरुस्ती, ‘पेव्हिंग ब्लॉक’ची निकृष्ट कामे करणाऱ्या ११ ठेकेदारांना एका वर्षासाठी काळ्या यादीत टाकण्यात आले आहे. निकृष्ट झालेल्या कामाचे दुप्पट पैसे ठेकेदारांकडून वसूल केले जाणार आहेत.**





महापालिकेच्या वतीने विविध विकासकामे केली जातात. स्थापत्य विभागातील रस्तेदुरुस्ती, ‘पेव्हिंग ब्लॉक’, मातीचे ‘जॉगिंग ट्रॅक’ची कामे घेण्यासाठी ११ ठेकेदारांनी ४० ते ४५ टक्के कमी दराने निविदा भरल्या. कमी दर देत १४ विकासकामे घेतली. मात्र, एवढ्या कमी दरात घेतलेल्या कामाचा दर्जा, गुणवत्तेबाबत आयुक्त शेखर सिंह यांना खात्री नव्हती. त्यामुळे त्यांनी ११ ठेकेदारांच्या कामाचा दर्जा तपासण्याचा आदेश दक्षता विभागाला दिले होते. दक्षता विभागाने शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाकडून (सीओईपी) कामांच्या दर्जाची तपासणी करून घेतली.

‘सीओईपी’ने केलेल्या तपासणीत पेव्हिंग ब्लॉक कामात खचलेले ब्लॉक, ज्या ठिकाणी दुरुस्ती आवश्यक अशा ठिकाणी दुरुस्तीच केली नाही.

महापालिका मानांकनानुसार काम नाही, रस्ते दुरुस्ती केल्यानंतर त्वरित खड्डे पडणे, काँक्रीट थराची जाडी कमी असणे, जॉगिंग ट्रॅकवर कमी माती टाकणे, निविदेनुसार काम न करणे अशा विविध बाबी समोर आल्या. या अहवालानंतर महापालिकेने निकृष्ट कामे करणाऱ्या ११ ठेकेदारांना कारणे दाखवा नोटीस पाठवून खुलासा मागविला.

मात्र, एकाही ठेकेदाराने समाधानकारक खुलासा सादर केला नाही. त्यानंतर ११ ठेकेदारांना एका वर्षासाठी काळ्या यादीत टाकण्याचा आणि निकृष्ट झालेल्या कामाचा दुप्पट खर्च वसूल करण्याचा निर्णय घेतला आहे.

### वर्षासाठी काळ्या यादीत

अजय घनश्याम खेमचंदानी, अनिकेत एंटरप्रायजेस, चैताली सप्लायर्स, कविता एंटरप्रायजेस, काव्या असोसिएट्स, मोटवानी ॲण्ड सन्स, नामदे एंटरप्रायजेस, आर. जी. मंगळवेढेकर, रामचंद्र एंटरप्रायजेस, सनसारा कन्स्ट्रक्शन आणि सोहम एंटरप्रायजेस या ११ ठेकेदारांना एक वर्षासाठी काळ्या यादीत टाकण्यात आले आहे.निकृष्ट कामे करणाऱ्या ११ ठेकेदारांना एका वर्षासाठी काळ्या यादीत टाकले आहे. निकृष्ट झालेल्या कामाचे दुप्पट पैसे वसूल केले जाणार असल्याचे पिंपरी-चिंचवड महापालिकेचे शहर अभियंता मकरंद निकम यांनी सांगितले.

---

## साहित्यसम्राट अण्णा भाऊ साठे पुतळ्याची दक्षता व सुशोभिकरण करा

### निगडी मेट्रो स्टेशन उभारणार; मेट्रो चे काम करणार महाव्यवस्थापक श्रावण हर्डीकर यांचे आश्वासन

। पिंपरी । प्रतिनिधी : महाईन्यूज

**पुणे महामेट्रोचा विस्ताराचे काम चालू असून निगडी येथील भक्ती शक्ती स्थानकावर लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांचा पुतळा आहे .याला लागूनच मेट्रो स्टेशन चे काम चालू आहे त्यामुळे पुतळ्याला कोणतीही बाधा येऊ नये तसेच पुतळ्याचे योग्य सुशोभीकरण करूनच मेट्रो स्टेशन चे विस्तारीकरण करा अशी मागणी आमदार अमित गोरखे यांनी महामेट्रो चे महाव्यवस्थापक श्रावण हर्डीकर यांच्याकडे केली आहे .आज पुण्यातील मेट्रो च्या मुख्य कार्यालयात पिंपरी चिंचवड येथील विविध सामाजिक संघटाबरोबर मेट्रो चे महाव्यवस्थापक श्रावण हर्डीकर यांची बैठक पार पडली .या बैठकीचे आयोजन आमदार अमित गोरखे यांनी केले होते.**



या बैठकीत स्थानिक समाजाच्या लोकभावना आमदार गोरखे यांनी मेट्रो प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिल्या .अण्णा भाऊ साठे यांच्या पुतळ्याला कोणतीही बाधा येऊ नये .पुतळा परिसराची योग्य असे सुशोभीकरण करावे .या स्थानकास लोकशाहीर अण्णा भाऊ साठे भक्ती शक्ती स्थानक असे नाव देण्यात यावे अशा मागण्या यावेळी करण्यात आल्या.

समाजाच्या सर्व मागण्याचा सकारात्मक विचार करणार असल्याचे आस्वाशन मेट्रो चे महाव्यवस्थापक श्रावण हर्डीकर यांनी यावेळी दिले . या बैठकीस आमदार अमित गोरखे , जेष्ठ नेते भाऊसाहेब अडागळे, माजी अध्यक्ष भगवान शिंदे नाना कसबे सतीश भवाळ सुनील भिसे अरुण जोगदंड संजय ससाणे साहित्यरत्न लोकशाहीर आण्णाभाऊ साठे जयंती महोत्सव समिती पिंपरी चिंचवड शहर अध्यक्ष नितीन घोलप सचिव बाळासाहेब रसाळ उपाध्यक्ष नाना कांबळे शिवाजी साळवे मारुती जाधव शंकर खवळे रोहन भिसे धीरज वाघमारे महेंद्र क्षीरसागर विवेक बुचडे सुरेश चव्हाण नाथा शिंदे यासह विविध पक्ष संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते .

# काश्मिरातील गाडली गेलेली पत्रकारिता




**राजकारणी जसे सक्तवसुली संचालनालयाच्या छाप्यांना घाबरून भाजपमध्ये जातात तसेच काश्मीरमध्ये पत्रकार स्वत:चा जीव वाचवण्यासाठी पत्रकारिता सोडतात वा प्रशासनाचे ऐकतात...**

सहा वर्षांपूर्वी काश्मीर खोऱ्यामध्ये फिरत असताना एका तरुण पत्रकाराशी खूप गप्पा झाल्या होत्या. त्याने त्याच्याच वयाची तरुण मुले गोळा केली होती, ती राजकारणावर बिनधास्त बोलत होती, आपापली मते मांडत होती. पंधरा-सोळा वर्षांची पोरे हातात बंदुका कशा घेत आहेत वगैरे अनेक मुद्द्यांवर उघडपणे भाष्य करत होती. आत्ता काश्मीरमध्ये त्याच तरुण पत्रकाराची भेट झाली. भेटताक्षणी तो म्हणाला, 'मी पत्रकारिता सोडली'! त्याचे हे वाक्य ऐकून धक्का बसला. हा पत्रकार स्वतंत्रपणे काम करत असे. देशी-विदेशी वर्तमानपत्रांमध्ये त्याचे लिखाण छापून येत असे. सरकार आणि प्रशासनाच्या कामावर बोट ठेवणाऱ्या त्याच्या अनेक बातम्या-लेख छापून आल्या होत्या. आता हा पत्रकार 'झाले ते पुरे झाले, मी मोकळा झालो' असे म्हणत होता. यावेळी काश्मीरमध्ये गेलो तेव्हा इतरही पत्रकारांची भेट झाली. त्यांचीही कहाणी कमी-अधिक प्रमाणात हीच होती. त्यांनी पत्रकारिता सोडली नव्हती; पण स्वत:वर बंधने घालून घेतली होती. काही पत्रकारांनी 'आम्ही नमते घेतले', अशी थेट कबुली




दिली. तर काहींनी भेटण्यास सरळ नकार दिला. काश्मीर खोऱ्यातील पत्रकारितेची दशा बघून म्हणावेसे वाटले, इथे पत्रकारितेची कबर सापडली!अनुच्छेद ३७० रद्द झाल्यानंतर काश्मीर खोऱ्यात कशी शांतता आहे, विकासाने कसा वेग घेतला आहे, दगडफेक कशी थांबलेली आहे, असे ढीगभर सकारात्मक वृत्तांत मुख्यधारेतील प्रसारमाध्यमांमधून येऊन गेलेले आहेत. काश्मीरबाहेरून तिथे गेलेल्या 'पॅरॅशूट पत्रकारां'नी असे वृत्तांत देणे समजण्याजोगे असते, त्यामध्ये त्यांचा दोष नसतो. वास्तववादी चित्रणाची त्यांच्याकडून काश्मिरी जनता अपेक्षाही करत नाही. पण स्थानिक पत्रकारांनीही 'पॅरॅशूट पत्रकारां'प्रमाणे 'गुडी गुडी' पत्रकारिता केली तर काही तरी नक्की बिनसलेले असते. शासन-प्रशासनाच्या दबावाला पत्रकार शरण गेल्याचे हे लक्षण असू शकेल.'काश्मीरमध्ये खरेच काय घडतेय याची माहिती तुम्हाला मिळते का? तुम्हाला स्मार्ट शहराबद्दल सांगितले जाईल, लाखो पर्यटक काश्मीरमध्ये कसे फिरत आहेत हे सांगितले जाईल, पण प्रशासनाच्या चुकांबद्दल एकही बातमी दिसणार नाही. ती छापली गेलीच तर त्या पत्रकाराकडे विचारणा होईल, मग हा पत्रकार हळूहळू स्वत:ला मोकळे करून घेण्याच्या मागे लागेल', असे एका अनुभवी पत्रकाराने सांगितले. विकास आणि शांतता या दोन मुद्द्यांवर प्रशासनाला जाब विचारणाऱ्या पत्रकाराची 'इथे खैर नाही!' असे वातावरण आहे. या पत्रकाराने याच मुद्द्यांवर प्रशासनाला प्रश्न विचारले होते. थेट दिल्लीतील गृहमंत्रालयातून त्याच्या मुख्य कार्यालयाला फोन गेला होता. काश्मीरमध्ये 'एजन्सी' हा शब्द खूप प्रचलित आहे. छोट्या पोरालाही 'एजन्सी' म्हणजे काय माहीत असते. एजन्सी म्हणजे पोलीस, आयबीपासून लष्करी गुप्तवार्ता विभागापर्यंत काहीही असू शकते. कोणीही तुमची चौकशी करण्यासाठी तुमचे दार ठोठावू शकतो. या अनुभवी पत्रकाराने प्रशासनाविरोधात दोन वृत्तांत दिल्यावर 'एजन्सी'मधून फोन आले. तुम्हाला पगार किती, घरात कोण-कोण असते, पत्नी कुठे काम करते, अशा अनेक चौकशी केल्या गेल्या. दर काही दिवसांनी असे फोन येऊ लागल्यावर या पत्रकाराने पोलिसांमधील एका परिचित-माहीतगाराशी संवाद साधला. त्यावर, 'तू प्रशासनाविरोधात दोन बातम्या दिल्या होत्यास म्हणून तुझी चौकशी केली जात आहे', असे त्याने सांगितले. काश्मीर खोऱ्यामध्ये 'एजन्सी'कडून होणारी विचारणा अपवाद नव्हे!भेटताक्षणी 'मी पत्रकारिता सोडली' असे सांगणाऱ्या तरुण पत्रकाराशी दोन-तीन तास बोलल्यानंतर त्याने त्याच्या या निर्णयामागील कारण सांगितले.'तुम्ही मला आधी भेटला होतात म्हणून मी आत्ता भेटायला तयार झालो. नाहीतर मी कोणाला भेटत नाही', असे तो म्हणत होता. त्याने एका बातमीसाठी वेगवेगळ्या लोकांचे 'कोट' घेतले होते. त्यासाठी एका व्यक्तीला भेटायला गेल्यावर तिथे काही लोक पोहोचले.

## प्रासंगिक »

### आणखी एक माघार..?

***दिल्लीत होणाऱ्या वस्तू व सेवा कर मंडळाच्या बैठकीतील सर्वाधिक लक्षणीय मुद्दा असेल तो वैद्याकीय विम्यावरील कराचा...***

वस्तू-सेवा कर परिषदेची (जीएसटी कौन्सिल) ५४ वी बैठक राजधानी दिल्लीत सोमवारी- ९ सप्टेंबर रोजी-भरत असून त्यात वैद्याकीय विमा आणि तत्संबंधी खर्चावरील कर आणि अनेक मुद्दे चर्चिले जातील. नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीनंतर देशात भाजपच्या जागी 'राष्ट्रीय लोकशाही आघाडी' (रालोआ) सरकार सत्तेवर आले. त्यानंतरची ही दुसरी बैठक. या बैठकीच्या पूर्वसप्ताहात अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी या कराच्या मुद्द्यावर केंद्र आणि राज्य सरकारे यांत कोणतेही घर्षण नाही, असे विधान केले. कसे होणार? भाजपेतर राज्ये सोडली तर या करावरून किरकिर करण्याची हिंमत दाखवणार कोण? पश्चिम बंगाल, तमिळनाडू, 'महाविकास आघाडी'च्या काळात महाराष्ट्र सरकार आदींनी या कराच्या अन्याय्य मुद्द्यांबाबत वेळोवेळी आवाज उठवला. उद्धव ठाकरे यांनी तर मुख्यमंत्री या नात्याने या कराच्या पुनर्रचनेची मागणी केली.

शाकाहार बरा की मांसाहार, कोंबडी गावठी चांगली की ब्रॉयलर, बकऱ्याचं मांस खाणं हृदयासाठी चांगलं की वाईट, गोवंशातील प्राण्यांचं मांस खाणं योग्य की अयोग्य, मांस श्रेष्ठ की मासे... वगैरे वाद तेव्हाच शक्य असतात जेव्हा पोटभर अन्न मिळण्याची शाश्वती असते.

# लोक खारींपासून हत्तींपर्यंत वाट्टेल ते का खातात?

जेव्हा त्यावरच प्रश्नचिन्ह निर्माण होतं तेव्हा केवळ पोट भरणं, पुरेसं अन्न उपलब्ध होईपर्यंत तगून राहणं महत्त्वाचं ठरतं. नामिबियाने आपल्या देशातील ७००हून अधिक प्राण्यांची मांसासाठी कत्तल करण्याचा निर्णय घेतला आहे. कारण आहे शतकातला सर्वांत भयंकर दुष्काळ. दुष्काळामुळे तिथली निम्मी लोकसंख्या म्हणजे तब्बल २५ लाख लोक उपासमारीच्या उंबरठ्यावर उभे आहेत. यापूर्वी २०२३ आणि २०१९मध्येही नामिबियात दुष्काळामुळे आणीबाणी जाहीर करण्यात आली होती. अशी परिस्थिती उद्भवली की वन्य प्राण्यांच्या शिकारीस परवानगी दिली जाते. मात्र यंदाचा दुष्काळ अधिक गंभीर आहे. अन्न आणि पाण्याचे दुर्भिक्ष्य निर्माण झाले आहे. पाच वर्षांखालील बालकांतील कुपोषणाने गंभीर रूप धारण केले आहे. यंदा तिथे फेब्रुवारी महिन्यातल्या सरासरी पावसाच्या तुलनेत केवळ २० टक्केच पाऊस पडला. नंतर नाहीच. आसपासच्या झिम्बाब्वे, मलावी, झाम्बिया या देशांमध्येही अशीच स्थिती



आहे. तिथेही राष्ट्रीय आणीबाणी जाहीर करण्यात आली आहे.नामिबिया हा जगातील सर्वाधिक हत्ती असलेल्या देशांपैकी एक आहे. तिथे एकंदर २४०० हत्ती आहेत. पर्यावरण मंत्रालयाने ज्या ७२३ वन्यप्राण्यांची कत्तल करण्याचा निर्णय जाहीर केला आहे त्यात पाणघोडे, म्हशी, इंपाला जातीची हरणे, नीलगायींसारखे ब्लू वाइल्ड बीस्ट, ३०० झेब्रा, ८३ हत्ती आणि १०० सांबर यांचा समावेश आहे. जिथे मोठ्या संख्येने वन्यप्राणी आहेत, अशा राष्ट्रीय उद्यानांतील प्राण्यांची शिकार करण्याचा निर्णय पर्यावरण मंत्रालयाने घेतला आहे. शिकारीचे दीर्घकालीन परिणाम जाणवू नयेत, हे त्यामागचे उद्दिष्ट आहे. सरकारने आधीच यापैकी १५७ प्राण्यांची कत्तल करून ५६ हजार ८७५ किलोग्रॅम मांस मिळविले आहे. प्राण्यांच्या शिकारीस परवानगी देण्यामागे केवळ खाण्यासाठी मांस मिळविणे हा एकमेव उद्देश नाही. मर्यादित प्रमाणात उपलब्ध असलेल्या अन्न, पाण्यासाठी मानव आणि वन्यप्राण्यांत होणारा संघर्ष नियंत्रणात ठेवणे हेदेखील लक्ष्य आहे. नामिबियात असा संघर्ष काही नवा नाही. २०२३मध्ये मानव आणि हत्तींतील संघर्षातून हत्तींची कत्तल करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. जगातील एकूण हत्तींपैकी निम्मे हत्ती नामिबियासह बोटस्वाना, झाम्बिया, झिम्बाब्वेमध्ये आहेत. त्यामुळे तिथे अनेकदा असे संघर्ष उद्भवतात. सध्याच्या दुष्काळी परिस्थितीत अन्न-पाण्याच्या शोधात प्राणी मानवी वस्तीत येतील, अशी भीती असते. राष्ट्रीय उद्यानांतील प्राण्यांची संख्या मर्यादित राहिल्यामुळे उर्वरित प्राणी-पक्षांना तुलनेने अधिक प्रमाणात अन्न उपलब्ध राहील, अशा विचारातून शिकारीला परवानगी देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# सरकार आल्याने काय बदल घडला?

## शरद पवारांचा ‘तो’ फोटो शेअर करत भाजपाचा चिमटा

। मुंबई ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार या पक्षाचे प्रमुख व ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी आज (सोमवार, ९ सप्टेंबर) लालबागच्या राजाचं दर्शन घेतलं. पवार हे त्यांचे जावई सदानंद सुळे (खासदार सुप्रिया सुळे यांचे पती) व नात रेवती सुळे यांना बरोबर घेत लालबागच्या राजाच्या दर्शनाला गेले होते. अनेक वर्षांनंतर शरद पवार लालबागच्या राजाच्या दर्शनाला गेले होते. त्यांच्याआधी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी देखील लालबागच्या राजाचं दर्शन घेतलं. दरम्यान, यावेळी लालबाग परिसरात चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.**



दरम्यान, शरद पवार लालाबागच्या राजाच्या दर्शनाला गेल्यामुळे महायुतीतले नेते त्यांच्यावर टीका करू लागले आहेत. यावरून, शरद पवार लालबागच्या राजाच्या दर्शनाला जाऊन राजकीय पोळी भाजण्याचा प्रयत्न करत असल्याची टीका भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी केली आहे.बावनकुळे यांनी एक्स या मायक्रोब्लॉगिंग प्लॅटफॉर्मवर एक पोस्ट केली आहे. या पोस्टमध्ये त्यांनी म्हटलं आहे की भाजपा आणि महायुतीचे सरकार आल्यानंतर काय झाले असा सवाल विरोधी पक्षांनी केला. आपल्या बहुआयामी विकासामुळे थेट विदेश गुंतवणुकीत (FDI) महाराष्ट्र प्रथम क्रमांकाचे राज्य बनले आहे. पण महायुती आल्यानंतर जो मोठा बदल झाला तो म्हणजे लालबागच्या राजाच्या दरबारातून आजचे चित्र समोर आले आहे. शरद पवारांना देव आठवले. महायुती आल्यानंतरचे हे बदल आहेत. ४० वर्षांत पहिल्यांदा असे घडले. याला राजकीय पोळी भाजणे म्हणतात. सध्या देशभर गणेशोत्सवाची धामधूम सुरू आहे. सामान्य नागरिकांसह अभिनेते, नेते व कलाकारांच्या घरीदेखील लाडका बाप्पा विराजमान झाला आहे. तसेच मुंबईसह महाराष्ट्रातील सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांच्या बाप्पांच्या दर्शनाला भाविक गर्दी करत आहेत. मुंबईतील प्रसिद्ध लालबागच्या राजाच्या दर्शनाला महाराष्ट्रासह देश-विदेशातून भाविक येत असतात. यामध्ये कलाकार, नेते आणि सेलिब्रेटिंचाही समावेश असतो. अशातच आज ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी लालबागच्या राजाचं दर्शन घेतलं. मात्र, पवार यांनी बाप्पाचं दर्शन घेतल्यानंतर भारतीय जनता पार्टी त्यांच्यावर टीका करू लागली आहे. लालबागच्या राजाचं दर्शन घेतल्यानंतर शरद पवार यांनी त्यांच्या फेसबूक अकाउंटवरून फोटो शेअर केले आहेत. यासह कॅप्शनमध्ये त्यांनी लिहिलं आहे की मुंबईच्या गणेशोत्सवाचं वैभव गिरणगावात पाहायला मिळतं. आज कुटुंबीयांसह इथल्या लालबागच्या राजाचं मनोभावे दर्शन घेतलं. बळीराजाच्या आणि जनसामान्यांच्या प्रश्नांवर लढण्याचं बळ मिळो, अशी लालबागच्या राजाचरणी प्रार्थना केली..बावनकुळे यांनी एक्स या मायक्रोब्लॉगिंग प्लॅटफॉर्मवर एक पोस्ट केली आहे. या पोस्टमध्ये त्यांनी म्हटलं आहे की भाजपा आणि महायुतीचे सरकार आल्यानंतर काय झाले असा सवाल विरोधी पक्षांनी केला. आपल्या बहुआयामी विकासामुळे थेट विदेश गुंतवणुकीत (FDI) महाराष्ट्र प्रथम क्रमांकाचे राज्य बनले आहे. पण महायुती आल्यानंतर जो मोठा बदल झाला तो म्हणजे लालबागच्या राजाच्या दरबारातून आजचे चित्र समोर आले आहे. शरद पवारांना देव आठवले. महायुती आल्यानंतरचे हे बदल आहेत. ४० वर्षांत पहिल्यांदा असे घडले. याला राजकीय पोळी भाजणे म्हणतात. सध्या देशभर गणेशोत्सवाची धामधूम सुरू आहे. सामान्य नागरिकांसह अभिनेते, नेते व कलाकारांच्या घरीदेखील लाडका बाप्पा विराजमान झाला आहे. तसेच मुंबईसह महाराष्ट्रातील सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांच्या बाप्पांच्या दर्शनाला भाविक गर्दी करत आहेत. मुंबईतील प्रसिद्ध लालबागच्या राजाच्या दर्शनाला महाराष्ट्रासह देश-विदेशातून भाविक येत असतात.मात्र, पवार यांनी बाप्पाचं दर्शन घेतल्यानंतर भारतीय जनता पार्टी त्यांच्यावर टीका करू लागली आहे.

### राजकीय पोळी भाजण्याचा प्रयत्न

दरम्यान, शरद पवार लालाबागच्या राजाच्या दर्शनाला गेल्यामुळे महायुतीतले नेते त्यांच्यावर टीका करू लागले आहेत. यावरून, शरद पवार लालबागच्या राजाच्या दर्शनाला जाऊन राजकीय पोळी भाजण्याचा प्रयत्न करत असल्याची टीका भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी केली आहे.बावनकुळे यांनी एक्स या मायक्रोब्लॉगिंग प्लॅटफॉर्मवर एक पोस्ट केली आहे. या पोस्टमध्ये त्यांनी म्हटलं आहे.

# अजित पवार बारामतीमधून निवडणूक लढवणार

## अजित पवार आमच्या ग्रुपचे कॅप्टन : छगन भुजबळ

। मुंबई ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**राज्यात विधानसभेची निवडणूक तोंडावर आल्यामुळे राजकीय वातावरण चांगलंच तापलं आहे. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय पक्षांच्या नेत्यांनी कंबर कसली आहे. मागील काही दिवसांपासून विविध मतदारसंघात नेत्यांचे दौरे वाढले आहेत. या दौऱ्यांच्या माध्यमातून मतदारसंघाचा आढावा आणि उमेदवारांची चाचपणी केली जात आहे.**

महाविकास आघाडी आणि महायुतीमधील पक्षात जागावाटपासंदर्भात खलबतं सुरु आहेत.यातच अजित पवारांनी रविवारी बारामतीत एका कार्यक्रमात बोलताना मोठं विधान केलं होतं. “एकदा बारामतीकरांना कुणीतरी मी सोडून आमदार मिळायला हवा”, असं अजित पवारांनी म्हटलं. यानंतर आता राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे नेते, मंत्री छगन भुजबळ यांनी सूचक भाष्य केलं आहे. “अजित पवार हे आमच्या ग्रुपचे कॅप्टन आहेत. ते निवडणूक लढवणार आहेत. असं मध्येच ते शस्त्र टाकू शकत नाहीत”, असं छगन भुजबळांनी म्हटलं आहे. महायुतीमधील पक्षांना जर चांगलं यश मिळवायचं असेल तर मला



वाटतं महायुतीमधील नेत्यांनी एकमेकांवर कोणतेही विधान करू नये.

कारण एकमेकांच्या विरोधातील विधानांमुळे विरोधी पक्षाला टीका करायला खाद्य मिळतं. शेवटी सर्वांचं लक्ष्य एकच आहे की पुन्हा एकदा महायुतीचं सरकार आणणं. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सर्वांना सूचना दिल्या आहेत. आता निवडणूक जवळ येत आहे. त्यामुळे कोणीही काहीही विधाने करू नये, असं त्यांनी सांगितलेलं आहे”, असं छगन भुजबळ यांनी आज माध्यमांशी बोलताना म्हटलं आहे. अजित पवार यांच्या निवडणुकीसंदर्भातील विधानाबाबत बोलताना छगन भुजबळ म्हणाले, “अजित पवार हे निवडणूक लढवणार आहेत.

### अजित पवार काय म्हणाले होते?

शेवटी ते आमच्या ग्रुपचे कॅप्टन आहेत. ते अशा प्रकारे मध्येच शस्त्र टाकू शकत नाहीत. मात्र, त्यांनी मांडलेली व्यथा ही काही दिवसांपूर्वी लोकसभेच्या निवडणुकीत जे काही झालं त्याबाबत व्यथा आहे”, असं छगन भुजबळांनी सांगितलं.बारामतीमधील एका कार्यक्रमात बोलताना अजित पवार म्हणाले होते की,”आता मीही ६५ वर्षांचा झालोय. मी समाधानी आहे. जिथे पिकतं, तिथे विकत नसतं. एकदा बारामतीकरांना कुणीतरी मी सोडून आमदार मिळायला हवा. मग तुम्ही ९१ ते २०२४ च्या माझ्या कारकिर्दीची आणि त्या नव्या माणसाच्या कारकिर्दीची तुलना करा”, अजित पवार म्हणाले होते.

# कोलकाता: नवा अहवाल सादर करा

## कोलकाता बलात्कार प्रकरणी न्यायालयाचे सीबीआयला निर्देश!

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**कोलकात्याच्या आर. जी. कर वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयातील प्रशिक्षणार्थी डॉक्टरवर झालेल्या बलात्कार आणि हत्येप्रकरणी तपासाबाबत नव्याने स्थिती अहवाल सादर करण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी सीबीआयला दिले. सरन्यायाधीश डीवाय चंद्रचूड म्हणाले, "सीबीआयने स्टेटस रिपोर्ट दाखल केला आहे. परंतु, याप्रकरणी अद्यापही तपास चालू आहे. आम्ही सीबीआयला नवीन स्टेटस रिपोर्ट दाखल करण्याचे निर्देश देतो."**



### तातडीने समस्या सोडवण्याचे निर्देश

आर. जी. कर मेडिकल कॉलेज आणि हॉस्पिटलचे रक्षण करणाऱ्या केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दलाच्या (सीआयएसएफ) कर्मचाऱ्यांना बंगाल सरकार सहकार्य करत नसल्याचे केंद्राने सर्वोच्च न्यायालयात सांगितले. केंद्राने नमूद केले आहे की "निवासाची अनुपलब्धता, सुरक्षा उपकरणे आणि वाहतुकीची कमतरता" यामुळे CISF कर्मचारी, विशेषत: महिला दलाला अनेक आव्हानांचा सामना करावा लागत आहे.सुप्रीम कोर्टाने राज्य सरकार आणि सीआयएसएफ या दोघांनाही तातडीने समस्या सोडवण्याचे निर्देश दिले आहेत. "आम्ही राज्य सरकारच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना आणि सीआयएसएफच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना या समस्येचे परीक्षण करण्याचे आणि जवळच्या ठिकाणी राहण्याची व्यवस्था करण्याचे निर्देश देतो.

कोलकाता बलात्कार आणि हत्या प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने सुमोटो याचिका दाखल करून घेतली होती. याप्रकरणी आज सुनावणी पार पडली. यावेळी सरन्यायाधीश म्हणाले, "आम्ही मंगळवारी नवा अहवाल पाहू. सीबीआय तपास करत आहे. त्यामुळे आम्ही सीबीआयला तपासाबाबत मार्गदर्शन करू इच्छित नाही. सीबीआयने स्टेटस रिपोर्ट सादर केल्यानंतर या अनैसर्गिक मृत्यू अहवालाच्या वेळेबाबतही न्यायालयाने स्पष्टीकरण मागितले आहे. ज्येष्ठ वकील कपिल सिब्बल यांनी खंडपीठाला सांगितले की, मृत्यू प्रमाणपत्र दुपारी १.४७ वाजता जारी करण्यात आले, तर पोलिसांनी २.५५ वाजता अनैसर्गिक मृत्यूची नोंद केली.", तर सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी पलटवार करताना सांगितले की, रेकॉर्डनुसार हा अहवाल रात्री ११.३० वाजता दाखल करण्यात आला होता. तसंच, या प्रकरणाचा निषेध करण्याकरता पुकारलेल्या आंदोलनामुळे २३ रुग्णांचा मृत्यू झाल्याची माहितीही कपिल सिब्बल यांनी सर्वोच्च न्यायालयात दिली. आर. जी. करहॉस्पिटलचे रक्षण करणाऱ्या केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दलाच्या (सीआयएसएफ) कर्मचाऱ्यांना बंगाल सरकार सहकार्य करत नसल्याचे केंद्राने सर्वोच्च न्यायालयात सांगितले. केंद्राने नमूद केले आहे की "निवासाची अनुपलब्धता, सुरक्षा उपकरणे आणि वाहतुकीची कमतरता" यामुळे CISF कर्मचारी, विशेषत: महिला दलाला अनेक आव्हानांचा सामना करावा लागत आहे.सुप्रीम कोर्टाने राज्य सरकार आणि सीआयएसएफ या दोघांनाही तातडीने समस्या सोडवण्याचे निर्देश दिले आहेत. "आम्ही राज्य सरकारच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना आणि सीआयएसएफच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना या समस्येचे परीक्षण करण्याचे आणि जवळच्या ठिकाणी राहण्याची व्यवस्था करण्याचे निर्देश देतो. बस, ट्रक आणि हलकी मोटार वाहनांसाठी कोणतीही व्यवस्था आज संध्याकाळी ५ वाजेपर्यंत केली जावी, असे आदेशात म्हटलं आहे. तसंच, "डॉक्टर, परिचारिका आणि पॅरामेडिकल कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेसाठी पश्चिम बंगाल राज्याने कोणती पावले उचलली आहेत?" असाही प्रश्न सरन्यायाधीश चंद्रचूड यांना विचारला. २० ऑगस्ट रोजी झालेल्या सुनावणीत सर्वोच्च न्यायालयाने या घटनेला भयंकर घटना म्हटलं होतं. तसंच, आरोग्य कर्मचाऱ्यांच्या सुरक्षा ठरवण्यासाठी प्रोटोकॉल तयार करण्याकरता १० सदस्यी राष्ट्रीय टास्क फोर्स नेमण्यात आला आहे. कोलकाता बलात्कार आणि हत्या प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने सुमोटो याचिका दाखल करून घेतली होती. याप्रकरणी आज सुनावणी पार पडली. यावेळी सरन्यायाधीश म्हणाले, "आम्ही मंगळवारी नवा अहवाल पाहू. सीबीआय तपास करत आहे. त्यामुळे आम्ही सीबीआयला तपासाबाबत मार्गदर्शन करू इच्छित नाहीमृत्यू प्रमाणपत्र दुपारी १.४७ वाजता जारी करण्यात आले, तर पोलिसांनी २.५५ वाजता अनैसर्गिक मृत्यूची नोंद केली.", तर सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी पलटवार करताना सांगितले की, रेकॉर्डनुसार हा अहवाल रात्री ११.३० वाजता दाखल करण्यात आला होता. तसंच, या प्रकरणाचा निषेध करण्याकरता पुकारलेल्या आंदोलनामुळे २३ रुग्णांचा मृत्यू झाल्याची माहितीही कपिल सिब्बल यांनी सर्वोच्च न्यायालयात दिली.

# आरएसएसची विचारधारा कधीच समजणार नाही

## राहुल गांधींनी थेट संघाला आणि भाजपाला लक्ष्य केलं

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**अमेरिका दौऱ्यावर असलेल्या राहुल गांधी यांनी रविवारी अप्रवासी भारतीयांच्या एका कार्यक्रमात बोलताना राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर जोरदार टीका केली होती. राहुल गांधींनी थेट राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या विचारसरणीवर बोट ठेवत संघाला आणि भाजपाला लक्ष्य केलं होतं. दरम्यान, या टीकेनंतर आता विविध राजकीय प्रतिक्रिया उमटू लागल्या आहेत.गांधींच्या टीकेला प्रत्युत्तर दिलं आहे.**



### राहुल गांधी काय म्हणाले होते?

राहुल गांधी विदेशात जाऊन केवळ भारताला बदनाम करण्याचा प्रयत्न करतात, असं प्रत्युत्तर त्यांनी दिलं.दरम्यान, राहुल गांधी यांनी अमेरिकेतील एका कार्यक्रमात बोलताना राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि भाजपाला लक्ष्य केलं होतं. "RSS ला वाटतं की भारत ही एक कल्पना आहे. आम्हाला वाटतं की भारत म्हणजे अनेक प्रकारच्या कल्पना आहेत. आम्हाला वाटतं प्रत्येकाला सहभाग घेण्याची संधी मिळायला हवी, स्वप्न पाहण्याची संधी मिळायला हवी. जात, धर्म, भाषा, संस्कृती, इतिहास या आधारावर भेदभाव न करता प्रत्येकाला त्याची जागा मिळायला हवी. हा खरा लढा आहे", असं राहुल गांधी म्हणाले होते.

भाजपाचे नेते गिरीराज सिंह यांनी आज एएनआय वृत्तसंस्थेशी संवाद साधला. यावेळी बोलताना त्यांना राहुल गांधी यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर केलेल्या टीकेबाबत विचारण्यात आलं, यासंदर्भात बोलताना, देशद्रोह्यांना राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची विचारधारा कधीच समजणार नाही, अशी प्रतिक्रिया गिरीराज सिंह यांनी दिली.राष्ट्रीय स्वयंसेवक संघाबाबत राहुल गांधी त्यांच्या आजी इंदिरा गांधी यांना काही विचारू शकतील, असं काही तंत्रज्ञान असेल, तर त्यांनी जाऊन विचारावं किंवा त्यांनी इतिहास चाळून बघावा. संघाबाबत जाणून घेण्यासाठी राहुल गांधींना शंभर जन्म घ्यावे लागतील. एक देशद्रोही राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची विचारधारा कधीच समजू शकत नाही.

हिंदू धर्मात गणेश चतुर्थीला विशेष महत्त्व आहे. हा सण दरवर्षी भाद्रपद महिन्यातील शुक्ल पक्षाच्या चतुर्थीला साजरा केला जातो. या उत्सवात सर्व देवतांमध्ये प्रथम पूजक असलेल्या श्री गणेशाला प्रसन्न करण्यासाठी त्यांची पूजा केली जाते यंदा गणेश चतुर्थी 19 सप्टेंबर 2023 रोजी साजरी होणार आहे. गणेश महोत्सवाची सुरुवात गणेश चतुर्थीपासून होते आणि हा उत्सव दहा दिवसांनंतर म्हणजेच अनंत चतुर्दशीला गणपती विसर्जनासह संपतो. या 10 दिवसात 10 वेगवेगळ्या वस्तू गणपतीला अर्पण केल्या जातात. असे मानले जाते की या 10 वस्तू अर्पण केल्याने गणपती बाप्पा खूप प्रसन्न होतात. यामुळे कुटुंबात सुख, शांती आणि समृद्धी नांदते. सर्व संकटे दूर होतात.

# या गोष्टी बाप्पा बाप्पाला करा अर्पण



गणपती बाप्पाला म्हणजेच गणपतीला मोदक अतिशय प्रिय आहेत. त्यामुळे गणेश चतुर्थीच्या दिवशी म्हणजेच श्रीगणेशाच्या जयंतीला प्रथम मोदक अर्पण करावा.



गणेशोत्सवाच्या दुसऱ्या दिवशी गणपती बाप्पाला म्हणजेच गण पतीला मोतीचूर लाडू अर्पण करणे उत्तम.



गणेशोत्सवाच्या तिसऱ्या दिवशी गणपती बाप्पाला म्हणजेच श्री गणेशाच्या पूजेत बेसन लाडू अर्पण करावेत.



सनातन धर्मात गणपतीला केळी अर्पण करणे श्रेष्ठ मानले जाते. म्हणूनच गणेश चतुर्थीच्या पूजेच्या चौथ्या दिवशी केळी अर्पण करावी.



गणेश जन्मोत्सवाच्या पाचव्या दिवशी घरच्या घरी स्वादिष्ट माखणा खीर बनवा आणि भोग म्हणून अर्पण करा.



गणेश चतुर्थीच्या दिवशी पूजेच्या सहाव्या दिवशी गणपतीला नारळ अर्पण करा.





जयंतीच्या 7 व्या दिवशी गणेश पूजेत सुक्या मेव्याचे लाडू अर्पण करावेत.



दुधापासून बनवलेले कलाकंद गणेशाला अतिशय प्रिय आहे. पूजेत कलाकंद अर्पण करा.



केशरापासून बनवलेले श्रीखंड बाप्पाला भोग म्हणून अवश्य अर्पण करा.



गणपतीच्या पूजेच्या शेवटच्या दिवशी बाजारातून किंवा घरी बनवलेले विविध प्रकारचे मोदक अर्पण करा.



## ॥ गणपती बाप्पा मोरया ॥



# श्रीलंकेने इंग्लंडमध्ये कसोटी जिंकली!

## श्रीलंकेने संपवला इंग्लंडमधला कसोटी विजयाचा दुष्काळ

नवी दिल्ली । । वृत्तसंस्था

**श्रीलंकेच्या संघाने आश्चर्यकारक कामगिरी केली आहे. ओव्हल येथे खेळल्या गेलेल्या तिसऱ्या कसोटीत श्रीलंकेने ८ विकेट्सनी विजय मिळवत इंग्लंडमधील १० वर्षांपासूनचा कसोटी विजयाचा दुष्काळ संपवला. त्याचबरोबर हा श्रीलंकेचा इंग्लंडमधील चौथा कसोटी विजय आहे. या विजयात सलामीवीर पाथुम निसांकाची सर्वात मोठी भूमिका होती. त्याने शानदार फलंदाजी करत शानदार शतक झळकावले. निसांकाने या शतकासह इतिहास घडवला आहे. इंग्लंडमध्ये कसोटीच्या चौथ्या डावात शतक झळकावणारा निसांका पहिला श्रीलंकन खेळाडू ठरला आहे.**




इंग्लंडमध्ये कसोटीच्या चौथ्या डावात शतक झळकावणारा पाथुम निसांका हा पहिला श्रीलंकेचा खेळाडू ठरला आहे. आपल्या शानदार खेळीत निसांकाने १२४ चेंडूत १०२.४२ च्या स्ट्राईक रेटने १३ चौकार आणि २ षटकारांसह नाबाद १२७ धावा केल्या. निसांकाने याआधी पहिल्या डावात शानदार अर्धशतक झळकावले होते. त्याने ९ चौकार मारत ५१ चेंडूत एकूण ६४ धावा केल्या होत्या. हे त्याचे कसोटी कारकीर्दीतील दुसरे शतक आहे. या सामन्यात इंग्लंड संघाने प्रथम फलंदाजी करताना पहिल्या डावात ऑली पोपच्या १५४ धावांच्या जोरावर सर्वबाद ३२५ धावा केल्या होत्या. यानंतर प्रत्युत्तरात श्रीलंका संघाने पहिल्या डावात सर्वबाद २६३ धावा केल्या होत्या. मात्र, दुसऱ्या डावात इंग्लंड संघाची फलंदाजी ढेपाळली आणि संपूर्ण संघ १५६ धावांवर गारद झाला. त्यामुळे हा सामना जिंकण्यासाठी श्रीलंकेला २१९ धावांचे लक्ष्य मिळाले होते. जे ४१व्या षटकात पाथुम निसांकाचे शतक आणि अँजेलो मॅथ्यूजच्या नाबाद ३२ धावांच्या जोरावर गाठले. कुसल मेंडिसने ३७ चेंडूत ७ चौकारांसह ३९ धावा केल्या, तर दिमुथ करुणारत्नेने २१ चेंडूत एक चौकार मारून ८ धावा केल्या.श्रीलंकेने ३३७० दिवसांनी इंग्लंडला त्यांच्या भूमीवर कसोटी सामन्यात पराभूत केले. श्रीलंकेने २४ जून २०१४ रोजी इंग्लंडला त्यांच्या भूमीवर अखेरचा पराभव केला आणि त्यानंतर आता या संघाला इंग्लंडमध्ये विजय मिळाला. तिसऱ्या सामन्याच्या पहिल्या डावात अर्धशतक आणि नंतर दुसऱ्या डावात नाबाद शतक झळकावणाऱ्या पाथुम निसांकाची सामनावीर म्हणून निवड करण्यात आली. या कसोटी मालिकेसाठी कमिंदू मेंडिस आणि जो रूट यांना प्लेयर ऑफ द सिरीजचा पुरस्कार देण्यात आला. या शानदार विजयासह श्रीलंकेने एक मोठा विक्रम केला. इंग्लंडमध्ये चौथ्या डावातील लक्ष्याचा यशस्वी पाठलाग करणारा तो पहिला उपखंडीय संघ ठरला आहे.इंग्लंड आणि श्रीलंका यांच्यात सुरू असलेली तीन कसोटी सामन्यांची मालिका संपली आहे. इंग्लंडने मालिकेतील पहिले दोन सामने जिंकून मालिका जिंकली, पण अखेरचा कसोटी सामना जिंकत श्रीलंकेने सर्वांची मन जिंकली आहेत. श्रीलंकेच्या संघाने तिसरा आणि शेवटचा सामना जिंकून जागतिक कसोटी चॅम्पियनशिपच्या गुणतालिकेत कमालीचा बदल घडवून आणला आहे.तीन सामन्यांच्या मालिकेतील अखेरच्या कसोटीत श्रीलंकेने इंग्लंडचा ८ गडी राखून पराभव केला. या विजयानंतरही श्रीलंकेच्या संघाने इंग्लंडविरुद्धची मालिका १-२ ने गमावली. कसोटी मालिकेतील पहिल्या दोन सामन्यात इंग्लंडने अनुक्रमे ५ विकेट्स आणि १९० धावांनी विजय मिळवला. श्रीलंकेने यापूर्वी २० जून २०१४ रोजी घरच्या मैदानावर इंग्लंडचा १०० धावांनी पराभव केला होता. तो कसोटी सामना लीड्समध्ये खेळला गेला होता. विशेष बाब म्हणजे श्रीलंकेने आतापर्यंत इंग्लंडविरुद्ध लंडनच्या केनिंग्टन ओव्हलवर दोन कसोटी सामने खेळले असून दोन्ही कसोटी सामने जिंकले आहेत.श्रीलंकेने यापूर्वी २७ ऑगस्ट १९९८ रोजी लंडनमधील केनिंग्टन ओव्हल येथे कसोटी सामना खेळला होता आणि त्यात १० गडी राखून विजय मिळवला होता. या विजयासह श्रीलंकेचा संघ २०२३-२०२५ च्या जागतिक कसोटी चॅम्पियनशिपच्या गुणतालिकेत पाचव्या स्थानावर पोहोचला आहे. तर इंग्लंडचा संघ टॉप-५ मधूनही बाहेर गेला आहे. इंग्लंड संघ आता डब्ल्यूटीसी गुणतालिकेत सहाव्या स्थानावर घसरला आहे, तर दक्षिण आफ्रिका सातव्या स्थानावर घसरला आहे. या कसोटी सामन्याचा निकाल येण्यापूर्वी WTC पॉइंट्स टेबलमध्ये श्रीलंका संघ सातव्या स्थानावर होता. इंग्लंड संघ पहिल्या दोन कसोटीत श्रीलंकेला पराभूत करत ४५ टक्के गुणांसह ५व्या क्रमांकावर पोहोचला, परंतु आता संघ पुन्हा खाली घसरला आहे. या सामन्यापूर्वी इंग्लंडचे ४५ टक्के गुण होते, ते आता ४२.१८ वर आले आहे. एक सामना गमावल्याने संघाचे मोठे नुकसान झाले आहे.

### श्रीलंकेने घेतली मोठी झेप

. परंतु निश्चितपणे जागतिक कसोटी चॅम्पियनशिपचे गुण टेबल खूपच मनोरंजक बनले आहे.लंडनमधील केनिंग्टन ओव्हल मैदानावर झालेल्या सामन्यात श्रीलंकेने नाणेफेक जिंकून गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. इंग्लंडने पहिल्या डावात ६९.१ षटकांत ३२५ धावा केल्या. श्रीलंकेचा पहिला डाव ६१.२ षटकांत २६३ धावांत आटोपला. त्यामुळे इंग्लंडला ६२ धावांची आघाडी मिळाली. इंग्लंडचा दुसरा डाव श्रीलंकेच्या गोलंदाजांनी ३४ षटकांत अवघ्या १५६ धावांत आटोपला. अशाप्रकारे श्रीलंकेला विजयासाठी २१९ धावांचे लक्ष्य मिळाले, जे त्यांनी २ गडी गमावून पूर्ण केले.

# भारताच्या हॉकी संघाची विजयी घोडदौड सुरू

## भारताने चीननंतर जपानचा 5-1 च्या फरकाने पराभव

। नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज

**आशियाई चॅम्पियन्स ट्रॉफी २०२४ मध्ये भारत आणि जपान यांच्यात सामना खेळला गेला. भारतीय संघाने हा सामना जिंकत आपली विजयी घोडदौड कायम सुरू आहे. या विजयासह टीम इंडिया गुणतालिकेत अव्वल स्थानावर पोहोचली आहे. भारताने हा सामना ५-१ अशा मोठ्या फरकाने जिंकला. या सामन्यानंतर भारतीय संघ अधिक चमकदार कामगिरी करत आहे. टीम इंडियाचा आशियाई चॅम्पियन्समधील हा सलग दुसरा विजय आहे.**




यापूर्वी भारताने यजमान संघ चीनचा ३-०च्या फरकाने पराभव केला.जपानविरुद्ध खेळल्या गेलेल्या सामन्यात भारतीय हॉकी संघाने सुरुवातीपासूनच आपला दबदबा कायम राखला. टीम इंडियाने सामना सुरू झाल्यानंतर दोन मिनिटांतच दोन गोल केले होते. त्यामुळे भारतीय संघाने जपानवर पूर्ण वर्चस्व राखले. भारतासाठी पहिला गोल सुखजित सिंगने केला आणि दुसरा गोल अभिषेकने केला. पहिल्या क्वार्टरच्या खेळानंतर टीम इंडिया २-० ने आघाडीवर होती. दुसऱ्या क्वार्टरचा खेळ सुरू झाला, ज्यामध्ये संजयने खेळाच्या १७व्या मिनिटाला भारताचा तिसरा गोल करून टीम इंडियाला मजबूत स्थितीत आणले. दुसऱ्या क्वार्टरनंतर टीम इंडिया ३-०ने आघाडीवर होती. भारताच्या चमकदार सुरूवातीनंतर पुढच्या दोन क्वार्टरमध्ये जपान पूर्णपणे दडपणाखाली असल्याचे दिसून आले. मात्र, तिसऱ्या क्वार्टरमध्ये भारताला एकही गोल करता आला नाही. जपानसाठी काझुमासा मात्सुमोटोने ४१व्या मिनिटाला गोल केला. जपानसाठी हा पहिलाच गोल ठरला.

### 5-1 असा विजय मिळवून दिला

तिसऱ्या क्वार्टरचा खेळ संपल्यानंतर या सामन्यात भारत ३-१ ने आघाडीवर होता. सामन्यातील चौथा क्वार्टर सुरू झाला, तो संपण्यापूर्वी हा सामना ३-१ अशा स्कोअर लाइनवर संपेल असे वाटत होते, पण शेवटच्या काही मिनिटांत उत्तम सिंग आणि सुखजित सिंग यांनी गोल केले. ५४व्या मिनिटाला उत्तम सिंगने आणि ६०व्या मिनिटाला सुखजित सिंगने गोल करत टीम इंडियाला ५-१ असा विजय मिळवून दिला.